# - प्रेस नोट -

दि. २७/०९/२०२६

## मालाड पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.२५/०९/२०२६ रोजी २१.४५ वा. च्या सुमारास फिर्यादी गौतम अनिल सिंग, वय- २४ वर्षे, धंदा-व्यवसाय, रा.ठी. सुरेश सिंग चाळ, वासरी हिल, गोरेगाव , (प.) मुंबई, हे त्यांच्या घरचा गणपती विसरर्जन करण्याकरीता जात असताना वासरी हिल सिग्नल, साईवनाथ मंदीर जवळ वासरी हिल गोरेगांव येथे फिर्यादी यांचे चुलते अटक आरोपी पुरूष क्र.०१ व फिर्यादी यांचे चुलत भाऊ अटक आरोपी पुरूष क्र.०२ व अटक आरोपी पुरूष क्र.०३ यांनी फिर्यादी व त्यांच्यामध्ये असलेल्या जुन्या प्रॉपर्टीच्या वादावरुन वाद करुन फिर्यादी यांच्या वडीलांच्या अंगावर पाणी व सिगारेट फेकले याचा फिर्यादी यांनी जाब विचारला असता, आरोपी यांनी संगनमत करुन फिर्यादी यांना व त्यांचे वडील व भाऊ यांना शिवीगाळ करुन हाताने मारहान केली. तसेच अटक आरोपी पुरूष क्र.०२ याने फिर्यादीचा गळा दाबला तसेच अटक आरोपी पुरूष क्र.०१ याने फिर्यादी यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याच्या उद्देशाने त्याचे जवळ असलेल्या लोखंडी रॉड ने फिर्यादी यांचे डोक्यात मारुन गंभीर जखमी केले म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.२६/०९/२०२६ रोजी गु.र.क्र. १५२०/२६, कलम १०९(१), ११५(२), ३५२, ३(५) बीएनएस २०२३, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------